# विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांचे कार्यालय

## मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,नाशिकरोड ४२२१०१

दुरध्वनी क्र.-२४६२४०१ (ई-मेल divcomnashik@gmail.com) फॅक्स क्र.-२४५२१९४.

************************************************************************************

क्र.मशा/कार्या.१/आस्था.५/१४०१४/२०१९,जा.क्र.-५२६६. दिनांक :- ०५ एप्रिल,२०१९.

**विषय :- <u>महाराष्ट्र महसूल अर्हता परिक्षा,मे-२०१९.</u>**
लिपीक-टंकलेखक संवर्गातुन अव्वल कारकुन पदावरीलपदोन्नतीसाठी आणि तलाठी संवर्गातुन मंडळाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी.

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार (अ) मध्ये शासन अधिसुचनेनुसार महसूल अर्हता परिक्षेबाबत खालील प्रमाणे दोन नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

१. शासन अधिसुचना क्र.संकीर्ण-१०९३/प्र.क्र.२/ई-१०,दिनांक-०४/०६/१९९८-तलाठ्यांच्या संवर्गातुन मंडळ अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसूल अर्हता परिक्षा नियम,१९९८.
२. शासन अधिसुचना क्र.परिक्षा १२८५/२७५५/प्र.क्र.३३९ (भाग-२)/ई-७,दिनांक-७/७/१९९९-लिपीक-टंकलेखक संवर्गातुन अव्वल कारकुन पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसुल अर्हता परिक्षा नियम,१९९९.

वरीलपैकी शासन अधिसुचना दिनांक-०४/०६/१९९८ अन्वये तलाठी संवर्गासाठी महसूल अर्हता परिक्षा नव्याने लागु करण्यात आली आहे. सदर परिक्षा विभागीय पातळीवरील विभागीय आयुक्त यांच्यामार्फत घेण्यात येत आहेत.

तथापी, लिपीक संवर्गातुन अव्वल कारकुन पदावरील पदोन्नतीसाठी शासन अधिसुचना दिनांक-०७/०७/१९९९ अन्वये प्रसिध्द केलेल्या सुधारीत नियमानुसार लिपीक संवर्गाच्या महसुल अर्हता परिक्षा लोकसेवा आयोगाच्या कक्षेतुन वगळुन विभागीय आयुक्त यांना अधिकार देण्यात आले आहेत.

उक्त दोन्ही नियमानुसार तलाठी संवर्गासाठी आणि लिपीक संवर्गासाठी महसूल अर्हता परिक्षा विभागीय आयुक्त यांनी घ्यावयाच्या असुन सदर दोन्ही संवर्गासाठी समान पाठ्यक्रम विहित केलेला आहे. त्यामुळे तलाठी संवर्गासाठी व लिपीक संवर्गासाठी महसूल अर्हता परिक्षा सोयीच्या दृष्टीने एकाच वेळी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नाशिक महसूल विभागातील तलाठी आणि लिपीक वर्गीय संवर्गाची एकत्रित महाराष्ट्र **महसूल अर्हता परिक्षा दिनांक-१४/०५/२०१९ ते १७/०५/२०१९ या कालावधीत** विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिक यांचेकडुन घेण्यात येणार आहे. त्याबाबतचा कार्यक्रम सोबत **परिशिष्ट-अ** मध्ये जोडला असुन जिल्हाधिकारी यांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. सोबतचा परिक्षा कार्यक्रम जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालये/शाखांमार्फत तात्काळ प्रसिध्द करावा.
२. लिपीक संवर्गाच्या महसूल अर्हता परिक्षेसाठी शासन अधिसुचना दि.०७/०७/१९९९ अन्वये प्रसिध्द झालेले नियम व सुधारीत पाठ्यक्रम लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावेत. सुधारीत पाठ्यक्रमानुसार परिक्षार्थींनी प्रश्नांची उत्तरे <u>मराठीतुन</u> लिहावयाची आहेत हे संबधितांच्या निदर्शनास आणुन द्यावे. तसेच महसूल अर्हता परिक्षेसाठी शासकिय प्रकाशनाची पुस्तके उपलब्ध नसल्यास परिक्षेसाठी खाजगी प्रशासनाची पुस्तके वापरण्यास शासनाचे पत्र क्र.संकिर्ण/४९९९/प्र.क्र.३१७/ई-१० दि.०७/०९/१९९९ अन्वये परवानगी दिलेली आहे. मात्र सदर पुस्तकांमध्ये प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी उपयुक्त टिपण्या किंवा प्रश्नांची उत्तरे नसावीत अशा सुचना आहेत. सदर सूचनाही संबधित उमेदवारांच्या / पर्यवेक्षकांच्या व समवेक्षकांच्या निदर्शनास आणुन द्याव्यात व परिक्षेच्यावेळी त्यांची काटेकोर अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

३. सदर परिक्षेस **<u>बसण्यास इच्छुक व पात्र असणाऱ्या</u>** परिक्षार्थी कर्मचाऱ्यांकडुन उक्त नियमांच्या **परिशिष्ट-ब** मधील *<u>विहित नमुन्यात अर्ज</u>* प्राप्त करुन घ्यावेत आणि <u>पात्र इच्छुक कर्मचाऱ्यांना परिक्षेस बसण्यास परवानगी देण्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव (तलाठी व लिपीक वर्गीय स्वतंत्र) परिपुर्ण माहितीसह व उमेदवारांचे विहीत नमून्यातील मूळ अर्जासह</u> ***<u>(सोबत जोडलेल्या नमून्यात)</u> दिनांक २०/०४/२०१९*** **पावेतो या कार्यालयास पाठवावा.** प्रस्तावात **परिक्षार्थीचे संपुर्ण नाव नमुद करावे. केवळ आद्याक्षरे नमुद करु नये.** अशा प्रकारे परिक्षार्थींचे नाव पाठविल्यास परिक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परिक्षार्थीची यादी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर करताना, सदर यादी ही परिक्षार्थीच्या आडनावाच्या मराठी मुळाक्षराच्या अनुक्रमानुसार तयार करुन पाठविण्याची दक्षता घ्यावी. उपरोक्त सुचनांनुसार परिक्षार्थींची माहिती सादर न केल्यास व त्यामुळे परिक्षार्थीचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी. निकाल जाहीर करताना केवळ अद्याक्षरांमुळे अडचणी येतात. त्यामुळे परिक्षार्थींची सर्व माहिती द्यावी. अपुर्ण माहिती प्राप्त झाल्यास संबधितांना परिक्षेस बसण्याची परवानगी नाकारण्यात येण्याची शक्यता आहे.

४. **<u>लिपीक / तलाठी संवर्गात पदोन्नतीने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचे बाबतीत तसेच आंतरजिल्हा व संवर्गबाह्य बदलीने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचे बाबतीत</u>** महसूल अर्हता परिक्षेतील नियमांचे अनुषंगाने खात्री करुन घेवुनच प्रस्ताव सादर करावेत. (उदा.-विभागीय दुय्यम सेवा परिक्षा उत्तीर्ण, सद्य संवार्गात सतत सेवा ३ वर्ष पूर्ण इ.)

५. अपंग परिक्षार्थी असल्यास त्याबाबत प्रस्तावात स्पष्टपणे उल्लेख करुन लेखनिक / मदतनीस पाहिजे असलेबाबत अगोदरच कळविणेत यावे.

६. या कार्यालयाकडुन परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिक्षेचे प्रवेशपत्र पुरविणेबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर *दि.१०/०५/२०१९* पुर्वी पुर्ण करावयाची आहे. प्रवेशपत्राशिवाय परिक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही याची सर्व उमेदवारांना समज देण्यात यावी.

७. **परिक्षार्थींनी यापूर्वी किती संधी उपभोगलेल्या आहेत व त्यात सुट मिळालेल्या पेपरबाबत सुस्पष्ट खुलासा घेऊन परिक्षार्थीचा संधी क्रमांक अचुक कळविण्यात यावा.** जर एखादया परिक्षार्थीचे संधीबाबत भविष्यात काही आक्षेप / तक्रार उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयाची राहील.

**तलाठी व लिपीक संवर्गाची एकत्रित परिक्षा नाशिक येथे मुख्यालयाच्या ठिकाणी डी.डी.बिटको बॉईज हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, नाशिक या ठिकाणी घेण्यात येईल.**

**स्थळप्रतीवर मा.विभागीय आयुक्त यांची स्वाक्षरी असे.**

(दिलीप स्वामी)
**उप आयुक्त (महसूल)**
**विभागीय आयुक्त,नाशिक करीता**

**प्रति,**
जिल्हाधिकारी, नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगाव / अहमदनगर.

# विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांचे कार्यालय

## मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,नाशिकरोड ४२२१०१

दुरध्वनी क्र.-२४६२४०१ (ई-मेल divcomnashik@gmail.com) फॅक्स क्र.-२४५२१९४.

**************************************************************************

क्र.मशा/कार्या.१/आस्था.५/१४०१४/२०१९,जा.क्र.-५२६६. दिनांक :- ०५ एप्रिल,२०१९.

**विषय :- महाराष्ट्र महसूल अर्हता परिक्षा,मे-२०१९.**
लिपीक-टंकलेखक संवर्गातुन अव्वल कारकुन पदावरीलपदोन्नतीसाठी आणि तलाठी संवर्गातुन मंडळाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी.

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार (अ) मध्ये शासन अधिसुचनेनुसार महसूल अर्हता परिक्षेबाबत खालील प्रमाणे दोन नियम प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

१. शासन अधिसुचना क्र.संकीर्ण-१०९३/प्र.क्र.२/ई-१०,दिनांक-०४/०६/१९९८-तलाठ्यांच्या संवर्गातुन मंडळ अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसूल अर्हता परिक्षा नियम,१९९८.
२. शासन अधिसुचना क्र.परिक्षा १२८५/२७५५/प्र.क्र.३३९ (भाग-२)/ई-७,दिनांक-७/७/१९९९-लिपीक-टंकलेखक संवर्गातुन अव्वल कारकुन पदावरील पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महसुल अर्हता परिक्षा नियम,१९९९.

वरीलपैकी शासन अधिसुचना दिनांक-०४/०६/१९९८ अन्वये तलाठी संवर्गासाठी महसूल अर्हता परिक्षा नव्याने लागु करण्यात आली आहे. सदर परिक्षा विभागीय पातळीवरील विभागीय आयुक्त यांच्यामार्फत घेण्यात येत आहेत.

तथापी, लिपीक संवर्गातुन अव्वल कारकुन पदावरील पदोन्नतीसाठी शासन अधिसुचना दिनांक-०७/०७/१९९९ अन्वये प्रसिध्द केलेल्या सुधारीत नियमानुसार लिपीक संवर्गाच्या महसुल अर्हता परिक्षा लोकसेवा आयोगाच्या कक्षेतुन वगळुन विभागीय आयुक्त यांना अधिकार देण्यात आले आहेत.

उक्त दोन्ही नियमानुसार तलाठी संवर्गासाठी आणि लिपीक संवर्गासाठी महसूल अर्हता परिक्षा विभागीय आयुक्त यांनी घ्यावयाच्या असुन सदर दोन्ही संवर्गासाठी समान पाठ्यक्रम विहित केलेला आहे. त्यामुळे तलाठी संवर्गासाठी व लिपीक संवर्गासाठी महसूल अर्हता परिक्षा सोयीच्या दृष्टीने एकाच वेळी घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नाशिक महसूल विभागातील तलाठी आणि लिपीक वर्गीय संवर्गाची एकत्रित महाराष्ट्र **महसूल अर्हता परिक्षा दिनांक-१४/०५/२०१९ ते १७/०५/२०१९ या कालावधीत** विभागीय आयुक्त,नाशिक विभाग,नाशिक यांचेकडुन घेण्यात येणार आहे. त्याबाबतचा कार्यक्रम सोबत **परिशिष्ट-अ** मध्ये जोडला असुन जिल्हाधिकारी यांना खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. सोबतचा परिक्षा कार्यक्रम जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालये/शाखांमार्फत तात्काळ प्रसिध्द करावा.
२. लिपीक संवर्गाच्या महसूल अर्हता परिक्षेसाठी शासन अधिसुचना दि.०७/०७/१९९९ अन्वये प्रसिध्द झालेले नियम व सुधारीत पाठ्यक्रम लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणुन देण्यात यावेत. सुधारीत पाठ्यक्रमानुसार परिक्षार्थींनी प्रश्नांची उत्तरे मराठीतुन लिहावयाची आहेत हे संबधितांच्या निदर्शनास आणुन द्यावे. तसेच महसूल अर्हता परिक्षेसाठी शासकिय प्रकाशनाची पुस्तके उपलब्ध नसल्यास परिक्षेसाठी खाजगी प्रशासनाची पुस्तके वापरण्यास शासनाचे पत्र क्र.संकिर्ण/४९९९/प्र.क्र.३१७/ई-१० दि.०७/०९/१९९९ अन्वये परवानगी दिलेली आहे. मात्र सदर पुस्तकांमध्ये प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी उपयुक्त टिपण्या किंवा प्रश्नांची उत्तरे नसावीत अशा सुचना आहेत. सदर सूचनाही संबधित उमेदवारांच्या / पर्यवेक्षकांच्या व समवेक्षकांच्या निदर्शनास आणुन द्याव्यात व परिक्षेच्यावेळी त्यांची काटेकोर अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

३. सदर परिक्षेस **बसण्यास इच्छुक व पात्र असणाऱ्या** परिक्षार्थी कर्मचाऱ्यांकडुन उक्त नियमांच्या **परिशिष्ट-ब** मधील *विहित नमुन्यात अर्ज* प्राप्त करुन घ्यावेत आणि पात्र इच्छुक कर्मचाऱ्यांना परिक्षेस बसण्यास परवानगी देण्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव (तलाठी व लिपीक वर्गीय स्वतंत्र) परिपुर्ण माहितीसह व उमेदवारांचे विहीत नमून्यातील मूळ अर्जासह ***(सोबत जोडलेल्या नमून्यात) दिनांक २०/०४/२०१९*** **पावेतो या कार्यालयास पाठवावा.** प्रस्तावात **परिक्षार्थीचे संपुर्ण नाव नमुद करावे. केवळ आद्याक्षरे नमुद करु नये.** अशा प्रकारे परिक्षार्थींचे नाव पाठविल्यास परिक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परिक्षार्थीची यादी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सादर करताना, सदर यादी ही परिक्षार्थीच्या आडनावाच्या मराठी मुळाक्षराच्या अनुक्रमानुसार तयार करुन पाठविण्याची दक्षता घ्यावी. उपरोक्त सुचनांनुसार परिक्षार्थींची माहिती सादर न केल्यास व त्यामुळे परिक्षार्थीचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची राहील याची कृपया नोंद घ्यावी. निकाल जाहीर करताना केवळ अद्याक्षरांमुळे अडचणी येतात. त्यामुळे परिक्षार्थींची सर्व माहिती द्यावी. अपुर्ण माहिती प्राप्त झाल्यास संबधितांना परिक्षेस बसण्याची परवानगी नाकारण्यात येण्याची शक्यता आहे.

४. **लिपीक / तलाठी संवर्गात पदोन्नतीने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचे बाबतीत तसेच आंतरजिल्हा व संवर्गबाह्य बदलीने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचे बाबतीत** महसूल अर्हता परिक्षेतील नियमांचे अनुषंगाने खात्री करुन घेवुनच प्रस्ताव सादर करावेत. (उदा.-विभागीय दुय्यम सेवा परिक्षा उत्तीर्ण, सद्य संवार्गात सतत सेवा ३ वर्ष पूर्ण इ.)

५. अपंग परिक्षार्थी असल्यास त्याबाबत प्रस्तावात स्पष्टपणे उल्लेख करुन लेखनिक / मदतनीस पाहिजे असलेबाबत अगोदरच कळविणेत यावे.

६. या कार्यालयाकडुन परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिक्षेचे प्रवेशपत्र पुरविणेबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर *दि.१०/०५/२०१९* पुर्वी पुर्ण करावयाची आहे. प्रवेशपत्राशिवाय परिक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही याची सर्व उमेदवारांना समज देण्यात यावी.

७. **परिक्षार्थींनी यापूर्वी किती संधी उपभोगलेल्या आहेत व त्यात सुट मिळालेल्या पेपरबाबत सुस्पष्ट खुलासा घेऊन परिक्षार्थीचा संधी क्रमांक अचुक कळविण्यात यावा.** जर एखादया परिक्षार्थीचे संधीबाबत भविष्यात काही आक्षेप / तक्रार उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयाची राहील.

**तलाठी व लिपीक संवर्गांची एकत्रित परिक्षा नाशिक येथे मुख्यालयाच्या ठिकाणी डी.डी.बिटको बॉईज हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज, नाशिक या ठिकाणी घेण्यात येईल.**

**स्वाक्षरीत/---**
(राजाराम माने)
**विभागीय आयुक्त,नाशिक**

**प्रति,**

जिल्हाधिकारी, नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगाव / अहमदनगर.

**प्रत :-** मा.व्यवस्थापक,शासकिय मध्यवर्ती मुद्रणालय,नेताजी सुभाषचंद्र रोड,चर्नीरोड रेल्वे स्टेशनजवळ मुंबई- ४ यांचे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

**प्रत :-** मा.उपसचिव,महसूल व वन विभाग, ई-७ व ई-१०,मंत्रालय,मुंबई-३२ यांना माहितीस्तव स.अ.

**प्रत :-** मा. अपर आयुक्त / मा.संचालक, नाशिक महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी / प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी / उपआयुक्त, महसूल / सामान्य प्रशासन / रोहयो / पुनर्वसन / पुरवठा / विकास ( आस्थापना ) / नियोजन / सहाय्यक आयुक्त ( मावक ) / सहाय्यक आयुक्त ( प्रशासन ) यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

**प्रत :-** निवडनस्ती (आस्थापना-५)

(दिलीप स्वामी)
**उप आयुक्त (महसूल)**
**विभागीय आयुक्त,नाशिक करीता**

# परिशिष्ट-अ

लिपीक-टंकलेखक संवर्गातुन अव्वल कारकुन पदांवरील पदोन्नतीसाठी व तलाठी संवर्गातुन मंडळाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी **महाराष्ट्र महसूल अर्हता परिक्षा,मे-२०१९.**

## वेळापत्रक

| अ.क्र. | प्रश्नपत्रिका क्र. | विषय व प्रश्नांच्या बाबी | गुण | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | प्रश्नपत्रिका क्र.१ (पुस्तकांसह) | **विषय व प्रश्नांच्या बाबी**<br>अ) भारतीय पुरावा अधिनियम,१८७२.<br>ब) फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ (प्रकरण १ ते ८, १० ते १४,१९,२०,२३ भाग (अ), २७,३२,३३,३४)<br>क) उच्च न्यायालय फौजदारी नियम पुस्तीका,१९६० (भाग १ ते ३,५,१८,२०,२४ ते २७) | १०० | मंगळवार दि.१४/०५/२०१९ सकाळी १०.०० ते १.०० |
| २ | प्रश्नपत्रिका क्र.२ (पुस्तकांशिवाय) | **पुढील बाबीवरील न्यायीक प्रश्न**<br>अ) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८.<br>ब) महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम,१९६७.<br>क) मुंबई पोलीस अधिनियम,१९५१. | १०० | मंगळवार दि.१४/०५/२०१९ दुपारी ०२.०० ते ५.०० |
| ३ | प्रश्नपत्रिका क्र.३ (पुस्तकांशिवाय) | **पुढील बाबीवरील महसूल विषयक प्रश्न**<br>अ) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता व त्याखालील नियम/महाराष्ट्र जमिन महसूल नियम पुस्तिका खंड-१.<br>ब) भारतीय वन अधिनियम,१९२७. | १०० | बुधवार दि.१५/०५/२०१९ सकाळी १०.०० ते १.०० |
| ४ | प्रश्नपत्रिका क्र.४ (पुस्तकांसह) | **पुढील बाबीवरील महसूल विषयक प्रश्न**<br>अ) महाराष्ट्र नगर पालिका अधिनियम,१९६५ व त्याखालील नियम.<br>ब) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति अधिनियम,१९६१ व त्या खालील नियम.<br>क) मुंबई दारुबंदी अधिनियम,१९४९ व त्याखालील नियम.<br>ड) भुसंपादन अधिनियम,१८९४ व त्याखालील नियम.<br>इ) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम,१९७६ व त्याखालील नियम.<br>ई) मुंबई वन्य पशु व वन्य पक्षी संरक्षण अधिनियम, १९५१ व त्याखालील नियम. | १०० | बुधवार दि.१५/०५/२०१९ दुपारी ०२.०० ते ५.०० |
| ५ | प्रश्नपत्रिका क्र.५ (पुस्तकांसह) | महाराष्ट्र जमिन महसूल नियम पुस्तिका खंड २, ३,४ व ५. | ७५ | गुरुवार दि.१६/०५/२०१९ सकाळी १०.०० ते १२.३० |
| ६ | प्रश्नपत्रिका क्र.६ (पुस्तकांसह) | १. मुंबई वित्तीय नियम,१९५९ (वित्तीय प्रकाशन क्र.१) भाग १ ते ६,११,१२.<br>२. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम,१९६५ (वित्तीय प्रकाशन क्र.९) भाग १ (कलम १ ते ६), भाग २ (कलम १ ते ११)<br>३. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका दुसरी आवृत्ती (वित्तीय प्रकाशन क्र.१०) प्रकरण १,२,३,४,ते ७, ९ (११२ ते ११७ परिच्छेद वगळुन) ( १० ते १२ व परिशिष्ट ८)<br>४. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम,१९८१. | १०० | गुरुवार दि.१६/०५/२०१९ दुपारी २.०० ते ५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ५. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,१९८१.<br>६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वियेत्तर सेवा, बडतर्फी,सेवेतुन काढुन टाकणे व निलंबन कालावधीतील भत्ते ) नियम,१९८१.<br>७. मुंबई नागरी सेवा नियम पुस्तीका वित्तीय प्रकाशन क्र.(५) प्रकरण-१२, भाग ३ ते ८,प्रवास भत्याशी संबधित फक्त खंड १ मधील १५ व १७. | | |
| ७ | प्रश्नपत्रिका क्र.७ (पुस्तकांसह) | **पुढील बाबीवर महसूल विषयक प्रश्न**<br>अ) मुंबई शेतजमिन व कुळकायदा अधिनियम, १९४८ व त्याखालील नियम.<br>ब) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यपध्दतीची नियम पुस्तीका.<br>क) सर्वेक्षण व जमाबंदी नियम पुस्तिका, खंड १ व खंड २ मधील पुढील भाग-<br>**खंड १ प्रकरण**<br>१) प्रास्ताविक.<br>२) जमिन महसूल प्रशासनाची भारतीय पध्दती.<br>७) मुळ जमाबंदी.<br>८) पुनर्निरीक्षण जमाबंदी.<br>९) भोगवट्याचा अधिकार व दायित्वे.<br>**खंड-२**<br>१) प्रास्ताविक.<br>८) जमाबंदी व कार्यपध्दती.<br>९) आकारणीची गणना.<br>१०) सर्वेक्षण व जमाबंदी अभिलेख. | ७५ | शुक्रवार दि.१७/०५/२०१९ सकाळी १०.०० ते १२.३० |

**टिप .:- प्रश्नांची उत्तरे मराठीतुनच लिहावी लागतील.**

**स्थळप्रतीवर मा.विभागीय आयुक्त यांची स्वाक्षरी असे.**

(दिलीप स्वामी)
**उप आयुक्त (महसूल)**
**विभागीय आयुक्त,नाशिक करीता**

# विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांचे कार्यालय

## मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,नाशिकरोड ४२२१०१

दुरध्वनी क्र.-२४६२४०१ (ई-मेल divcomnashik@gmail.com) फॅक्स क्र.-२४५२१९४.

**********************************************************************************

क्र.मशा/कार्या.१/आस्था.५/१४०१४/१/२०१९,जा.क्र.-५२६६. दिनांक :- ०५ एप्रिल,२०१९.

**प्रति,**

जिल्हाधिकारी,नाशिक.

**विषय :-** **महाराष्ट्र महसूल अर्हता परिक्षा,मे-२०१९.**
लिपीक-टंकलेखक संवर्गातुन अव्वल कारकुन पदावरीलपदोन्नतीसाठी आणि तलाठी संवर्गातुन मंडळाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी.

तलाठी संवर्गातुन मंडळाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी तसेच लिपीक संवर्गातुन अव्वल कारकून पदावरील पदोन्नतीसाठी एकत्रित महसूल अर्हता परिक्षा हि ***दिनांक-१४/०५/२०१९ ते १७/०५/२०१९*** या कालावधीत घेण्यात येणार असुन त्याबाबतचा कार्यक्रम स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात आलेला आहे.

सदर परिक्षा नाशिक विभागातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहमदनगर या जिल्ह्यासाठी **नाशिक** येथे मुख्यालयाच्या ठिकाणी घ्यावयाची आहे. त्यादृष्टीने विभागीय आयुक्त यांचेवतीने आपणाकडुन खालील कार्यवाही अपेक्षित आहे.

१. नाशिक विभागातील परिक्षार्थींची परिक्षेसाठी बैठक व्यवस्था डी.डी.बिटको बॉईज हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज,नाशिक या केंद्रावर करण्यात यावी.
२. परिक्षा केंद्रावर बैठक व्यवस्था, पर्यवेक्षण व्यवस्था तसेच परिक्षा व्यवस्थित पार पाडण्यासाठी व संभाव्य गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व उपाय योजना **निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक** यांनी करावयाची आहे. या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीची माहिती या कार्यालयास ज्ञात करावी. (आदेशाची एक प्रत या कार्यालयास पाठवावी)
३. परिक्षेसाठी *केंद्रप्रमुख म्हणुन* ***उपजिल्हाधिकारी,*** *पर्यवेक्षक म्हणुन* ***तहसिलदार*** *व समवेक्षक म्हणुन* ***नायब तहसिलदार*** *दर्जाच्या अधिकाऱ्यांची* नेमणूक करावी. समवेक्षक म्हणुन अव्वल कारकून / लिपीक / तलाठी यांची नेमणूक करण्यात येवू नये.
४. प्रत्यक्ष परिक्षा कक्षात परिक्षार्थींना ***मोबाईल फोन, डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन इत्यादी सारखी इलेक्ट्रॉनिक साधने वापरण्यास सक्त मनाई करण्यात यावी.*** अशी साधने परिक्षा कक्षात घेवुन न जाणेबाबतची घोषणा परिक्षेच्या प्रवेशव्दारावरच करण्यात यावी. त्यानंतरही अशा प्रकारची साधने परिक्षार्थी उमेदवारांचे जवळ आढळून आल्यास परिक्षार्थींबरोबरच संबंधीत कक्षाचे समवेक्षक, पर्यवेक्षक व केंद्रप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येवून त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.
५. प्रथम सत्राची परिक्षा संपल्यानंतर उमेदवार परिक्षा केंद्राच्या बाहेर गेल्यास पुढिल सत्राच्या प्रवेशावेळी त्याची पुन्हा तपासणी करण्यात यावी व उक्त इलेक्ट्रॉनिक साधने नसलेबाबतची खातरजमा करावी. महिला उमेदवारांची तपासणी महिला पर्यवेक्षकांकडूनच करण्याबाबत दक्षता घ्यावी.
६. अपंग परिक्षार्थींची तपासणी काळजीपुर्वक व सौजन्याने करावी.
७. परिक्षेकरीता नियुक्त पर्यवेक्षक / समवेक्षक यांना परिक्षेच्या दालनात मोबाईल फोनचा वापर करण्यास सक्त मनाई असलेबाबतची अट त्यांचे नियुक्ती आदेशातच नमूद करण्यात यावी.
८. प्रत्यक्ष परिक्षेकरीता उमेदवार परिक्षा दालनात जागेवर बसल्यानंतर बॅग्ज, मोबाईल फोन, पेजर्स इतर दुरसंचार साधने अथवा दुरसंचारासाठी वापरण्यात येणारी कोणतीही साधने, पुस्तके

(पुस्तकांसह असणाऱ्या पेपर साठी महसूल अर्हता परिक्षेसाठीच्या पाठ्यक्रमात नमूद असलेली पुस्तके वगळुन) अथवा कॅलक्युलेटर इ. साहित्य जवळ बाळगण्यास अथवा त्याचा वापर करण्यास सक्त मनाई असल्याबद्दल प्रत्येक सवमेक्षकाने परिक्षा दालनामध्ये दोन्ही सत्रासाठी सत्राच्या प्रारंभीच घोषणा करावी.

९. आपले कार्यालयाकडून पेपर चालू असतानाच्या कालावधीत पेपर संपल्यानंतर दररोज उपस्थित व अनुपस्थित परिक्षार्थींची माहितीचे सिलबंद पाकीट सादर करण्यात येते. परिक्षेच्या वेळी उपस्थित / अनुपस्थित परिक्षार्थींचे नंबरमध्ये पेपर तपासणी वेळी तफावत असल्याचे संबंधीत तपासणी अधिकारी यांनी निदर्शनास आणून दिलेले आहे. यासंदर्भात अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत याबाबत संबंधीतांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात. अन्यथा अशा प्रकारच्या चुका आढळून आल्यास संबंधीत समवेक्षक पर्यवेक्षक व केंद्रप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येवून त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

१०. याशिवाय इतर सुरक्षाविषयक आवश्यक त्या उपाययोजना आपले स्तरावरुन करण्यात याव्यात.

११. परिक्षा कालावधीतील केंद्रावर पालन करावयाच्या उक्त नमूद सूचनांची आपले जिल्ह्यातील परिक्षार्थींना जाणीव करुन देण्यात यावी.

१२. परिक्षेच्या दिवशी विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन प्रश्नपत्रिका घेवुन जाणे व पेपर संपल्यानंतर उत्तरपत्रिका मोहोरबंद करुन विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचती करणेकामी अधिकारी / कर्मचारी (शासकीय वाहनासह) यांची नियुक्ती करावी व तसे केलेबाबत या कार्यालयास ज्ञात करावे. (कर्मचारी नियुक्ती आदेशाची व शासकीय वाहन अधिग्रहण आदेशाची प्रत या कार्यालयास पाठवावी) तसेच सोबत उमेदवारांच्या हजेरीपटाचे स्वाक्षरीच्या तक्ताही सादर करावा.

**स्थळप्रतीवर मा.विभागीय आयुक्त यांची स्वाक्षरी असे.**

(दिलीप स्वामी)
**उप आयुक्त (महसूल)**
**विभागीय आयुक्त, नाशिक करीता**

# विभागीय आयुक्त, नाशिक विभाग,नाशिक यांचे कार्यालय

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,नाशिकरोड ४२२१०१
दुरध्वनी क्र.-२४६२४०१ (ई-मेल divcomnashik@gmail.com) फॅक्स क्र.-२४५२१९४.

******************************************************************************

क्र.मशा/कार्या.१/आस्था.५/१४०१४/१/२०१९,जा.क्र.-५२६६. दिनांक :- ०५ एप्रिल,२०१९.

**प्रति,**

जिल्हाधिकारी,नाशिक.

**विषय :- <u>महाराष्ट्र महसूल अर्हता परिक्षा,मे-२०१९.</u>**
लिपीक-टंकलेखक संवर्गातुन अव्वल कारकुन पदावरीलपदोन्नतीसाठी आणि तलाठी संवर्गातुन मंडळाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी.

तलाठी संवर्गातुन मंडळाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी तसेच लिपीक संवर्गातुन अव्वल कारकून पदावरील पदोन्नतीसाठी एकत्रित महसूल अर्हता परिक्षा हि ***दिनांक-१४/०५/२०१९ ते १७/०५/२०१९*** या कालावधीत घेण्यात येणार असुन त्याबाबतचा कार्यक्रम स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात आलेला आहे.

सदर परिक्षा नाशिक विभागातील नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव व अहमदनगर या जिल्ह्यासाठी **<u>नाशिक</u>** येथे मुख्यालयाच्या ठिकाणी घ्यावयाची आहे. त्यादृष्टीने विभागीय आयुक्त यांचेवतीने आपणाकडुन खालील कार्यवाही अपेक्षित आहे.

१. नाशिक विभागातील परिक्षार्थींची परिक्षेसाठी बैठक व्यवस्था डी.डी.बिटको बॉईज हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज,नाशिक या केंद्रावर करण्यात यावी.
२. परिक्षा केंद्रावर बैठक व्यवस्था, पर्यवेक्षण व्यवस्था तसेच परिक्षा व्यवस्थित पार पाडण्यासाठी व संभाव्य गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने आवश्यक ती सर्व उपाय योजना **<u>निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक</u>** यांनी करावयाची आहे. या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीची माहिती या कार्यालयास ज्ञात करावी. (आदेशाची एक प्रत या कार्यालयास पाठवावी)
३. परिक्षेसाठी <u>*केंद्रप्रमुख म्हणुन **उपजिल्हाधिकारी**, पर्यवेक्षक म्हणुन **तहसिलदार** व समवेक्षक म्हणुन **नायब तहसिलदार** दर्जाच्या अधिकाऱ्यांची*</u> नेमणूक करावी. <u>समवेक्षक म्हणुन अव्वल कारकून / लिपीक / तलाठी यांची नेमणूक करण्यात येवू नये.</u>
४. प्रत्यक्ष परिक्षा कक्षात परिक्षार्थींना ***<u>मोबाईल फोन, डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन इत्यादी सारखी इलेक्ट्रॉनिक साधने वापरण्यास सक्त मनाई करण्यात यावी.</u>*** अशी साधने परिक्षा कक्षात घेवुन न जाणेबाबतची घोषणा परिक्षेच्या प्रवेशव्दारावरच करण्यात यावी. त्यानंतरही अशा प्रकारची साधने परिक्षार्थी उमेदवारांचे जवळ आढळून आल्यास परिक्षार्थींबरोबरच संबंधीत कक्षाचे समवेक्षक, पर्यवेक्षक व केंद्रप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येवून त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.
५. प्रथम सत्राची परिक्षा संपल्यानंतर उमेदवार परिक्षा केंद्राच्या बाहेर गेल्यास पुढिल सत्राच्या प्रवेशावेळी त्याची पुन्हा तपासणी करण्यात यावी व उक्त इलेक्ट्रॉनिक साधने नसलेबाबतची खातरजमा करावी. महिला उमेदवारांची तपासणी महिला पर्यवेक्षकांकडूनच करण्याबाबत दक्षता घ्यावी.
६. अपंग परिक्षार्थींची तपासणी काळजीपुर्वक व सौजन्याने करावी.
७. परिक्षेकरीता नियुक्त पर्यवेक्षक / समवेक्षक यांना परिक्षेच्या दालनात मोबाईल फोनचा वापर करण्यास सक्त मनाई असलेबाबतची अट त्यांचे नियुक्ती आदेशातच नमूद करण्यात यावी.
८. प्रत्यक्ष परिक्षेकरीता उमेदवार परिक्षा दालनात जागेवर बसल्यानंतर बॅग्ज, मोबाईल फोन, पेजर्स इतर दुरसंचार साधने अथवा दुरसंचारासाठी वापरण्यात येणारी कोणतीही साधने, पुस्तके

(पुस्तकांसह असणाऱ्या पेपर साठी महसूल अर्हता परिक्षेसाठीच्या पाठ्यक्रमात नमूद असलेली पुस्तके वगळुन) अथवा कॅलक्युलेटर इ. साहित्य जवळ बाळगण्यास अथवा त्याचा वापर करण्यास सक्त मनाई असल्याबद्दल प्रत्येक सवमेक्षकाने परिक्षा दालनामध्ये दोन्ही सत्रासाठी सत्राच्या प्रारंभीच घोषणा करावी.

९. आपले कार्यालयाकडून पेपर चालू असतानाच्या कालावधीत पेपर संपल्यानंतर दररोज उपस्थित व अनुपस्थित परिक्षार्थींची माहितीचे सिलबंद पाकीट सादर करण्यात येते. परिक्षेच्या वेळी उपस्थित / अनुपस्थित परिक्षार्थींचे नंबरमध्ये पेपर तपासणी वेळी तफावत असल्याचे संबंधीत तपासणी अधिकारी यांनी निदर्शनास आणून दिलेले आहे. यासंदर्भात अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत याबाबत संबंधीतांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात. अन्यथा अशा प्रकारच्या चुका आढळून आल्यास संबंधीत समवेक्षक पर्यवेक्षक व केंद्रप्रमुख यांना जबाबदार धरण्यात येवून त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

१०. याशिवाय इतर सुरक्षाविषयक आवश्यक त्या उपाययोजना आपले स्तरावरुन करण्यात याव्यात.

११. परिक्षा कालावधीतील केंद्रावर पालन करावयाच्या उक्त नमूद सूचनांची आपले जिल्ह्यातील परिक्षार्थींना जाणीव करुन देण्यात यावी.

१२. परिक्षेच्या दिवशी विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन प्रश्नपत्रिका घेवुन जाणे व पेपर संपल्यानंतर उत्तरपत्रिका मोहोरबंद करुन विभागीय आयुक्त कार्यालयात पोहोचती करणेकामी अधिकारी / कर्मचारी (शासकीय वाहनासह) यांची नियुक्ती करावी व तसे केलेबाबत या कार्यालयास ज्ञात करावे. (कर्मचारी नियुक्ती आदेशाची व शासकीय वाहन अधिग्रहण आदेशाची प्रत या कार्यालयास पाठवावी) तसेच सोबत उमेदवारांच्या हजेरीपटाचे स्वाक्षरीच्या तक्ताही सादर करावा.

**स्वाक्षरीत/---**
(राजाराम माने)
**विभागीय आयुक्त, नाशिक**

**प्रति,**

जिल्हाधिकारी, धुळे / नंदुरबार / जळगाव / अहमदनगर.

**प्रति :-** मा. अपर आयुक्त / मा.संचालक, नाशिक महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी / प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी / उपआयुक्त, महसूल / सामान्य प्रशासन / रोहयो / पुनर्वसन / पुरवठा / विकास ( आस्थापना ) / नियोजन / सहाय्यक आयुक्त ( मावक ) / सहाय्यक आयुक्त ( प्रशासन ).

२/- परिक्षा कालावधीतील केंद्रावर पालन करावयाच्या उक्त नमूद सूचनांची आपले अधिनस्त कार्यरत असणाऱ्या व विषयांकित परिक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या परिक्षार्थींना जाणीव करुन देण्यात यावी.

(दिलीप स्वामी)
**उप आयुक्त (महसूल)**
**विभागीय आयुक्त, नाशिक करीता**